
डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार

# अवलोकन..अनुभव..मनोव्यापार

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# अवलोकन..अनुभव..मनोव्यापार

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अवलोकन..अनुभव..मनोव्यापार

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : ७ एप्रिल २०१९


©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:






1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास
12. शिभ्रष्टाचार!
13. आधुनिक कहाण्या
14. अवलोकन..अनुभव..मनोव्यापार


ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

www.esahity.com



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I
HALL OF RESIDENCE
प्रेमातुराणां



डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार
२


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका


डॉ. नितीन मोरे
पत्र
LETTERS
प्रिय पत्रास,


डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स


डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे


डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

## डॉ. नितीन मोरे यांच्या चौदाव्या पुस्तकाच्या निमित्ताने

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने,

दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची चार,डॉ. स्मिता दामले यांची सात, डॉ. वृषाली जोशी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

# *अ.. अ ..म !*

अर्पणपत्रिका..

या नाटकाच्या पहिल्या 'वाचिका' ताई माई आणि राजूस

## अंक पहिला

### *प्रवेश पहिला*

स्थळ:

कॉलेज विद्यार्थ्यांच्या होस्टेलची खोली.

एक टेबल, टेबल लॅंप सकट. टेबलावर पुस्तकांचा पसारा. अस्ताव्यस्त असला तरी पोरे अभ्यासू आहेत एवढे दाखवणारा. पाठच्या भिंतींवर चार्ट्स.. अभ्यासाचे वेळापत्रक वगैरे लावलेले. दोन बेड्स. त्यात गादी.. अव्यवस्थितपणा सगळीकडे. दोन खुर्च्या. एकावर बसलेला बबन. लिहीत बसलेला. बबन किडकिडीत असला तरी चेहऱ्यावरून स्मार्ट वाटणारा. डोळयावर चष्मा आणि केस अस्ताव्यस्त वाढलेले. दुसरा अनिरुद्ध. दोघे साधारण बावीस तेवीसचे असावेत. अनिरुद्ध बाजूला बेडवर बसून मोबाईलवर काहीतरी करत बसला आहे. पाठी कॅलेंडरवर ३ तारीख डिसेंबर महिन्यातली.. कॅलेंडर ही तारीख दररोज बदलण्यासारखे .. किराणा दुकानात असते असे.. टांगलेले..

बबन: काय करू रे.. सुचत नाही काही

अनिरुद्ध: सुचेल.. टिळकांनी काय म्हटले आठवते ना?

बबन: काय म्हटले?

अनिरुद्ध: दोन पैशाची भांग घेतली की हव्या तितक्या कल्पना सुचतात..

बबन: काय? म्हणून काय भांग घेऊ? अरे, साधा भांग पाडत नाही मी.. घेतोय कसला?

अनिरुद्ध: नकोस घेऊ मग..

बबन: असे म्हणतात, अनुभव, सूक्ष्म अवलोकन आणि अचूक मनोव्यापाराचे ज्ञान ही यशस्वी लिखाणाची गुरूकिल्ली असते.. अ अ म.. अवलोकन.. अनुभव आणि मनोव्यापार! अवलोकन तर मी करतो.. आता हेच पहा.. सकाळी उठल्यापासून तू डोक्यावर हात कितीदा फिरवलास? तुला ठाऊक नसेल पण मला ठाऊक आहे! त्यात तीन वेळा तुला डोक्यात उवा सापडल्या.. त्यातील दोघांना तू जीवे मारलेस. एकीस खिडकीतून मोक्ष मिळण्याची सोय केलीस! आहे की नाही लक्ष माझे?

अनिरुद्ध: मग? तुझे काय म्हणणे आहे? या उवा अवलोकनातून तू लिहायला स्फूर्ती घेशील? त्या उवेच्या मनोव्यापारातून तू एका उवेचे आत्मचरित्र लिहू शकशील? एक जू की आत्मकहानी.. किंवा डायरी ऑफ ॲन ऊ..? बोटाच्या चिमटीत चिरडून चिमण्या उवेच्या चिमुकल्या जीवावर आलेल्या संकटाची चित्तरकथा? किंवा एका तरूण तडफदार आणि हॅंडसम युवकावर डोके खाजवण्याची का वेळ यावी.. त्याच्या मनोव्यापारावर काही.. अव्यापारेषु व्यापार!

बबन: ते सारे ठीक.. पण हा तरूण तडफदार वगैरे वगैरे कुठे दिसणार?

अनिरुद्ध: इथेच.. इथेच कमी पडतोस तू.. इथेच कमी पडतोस. अरे तुझ्या नयनांसमोर हा जिताजागता नमुना असताना.. तुझे अवलोकन कमी इथेच तर पडते रे! हा मी समोर बसलेला आहे तुझ्या.. काखेत कळसा आणि गावाला वळसा मारायला चाललायस? होतकरू युवका.. मी तुझा मॉडेल होण्यास तयार आहे.. तरूण आणि तडफदार!

बबन: मॉडेल? चित्र नाही.. गोष्ट लिहायचीय.. जमले तर एखादी सुंदरशी नाटिका! त्यात मॉडेल?

अनिरुद्ध: रोल मॉडेल! एका तरूण तडफदार.. हॅंडसम.. झालेच तर कर्तृत्ववान.. धडाडीच्या तरुणाचे रोल मॉडेल..

बबन: तू? एक सेकंद.. तुला भूमिती होती ना शाळेत?

अनिरुद्ध: भूमी होती... भूमिका होती.. भूगोल होता.. भूमिती होती..

बबन: भू भू करू नकोस.. भूमी.. भूमिका.. म्हणजे?

अनिरुद्ध: नाही आठवत? पहिल्या बाकावरची दोन वेण्यावाली भूमी आणि ती उंच ताड माड भूमिका!

बबन: त्या बऱ्या आठवतात.. भूगोल?

अनिरुद्ध: इल्ले.. तेव्हा पण आणि आता पण.. पृथ्वीइतका भोपळा.. आणि तेवढेच भूगोलाचे ज्ञान.. पण भूमितीचा कसला विषय काढलास?

बबन: भूगोलच नाहीतर.. भूमितीत वर्तुळ काय नि भूगोलात पृथ्वी काय.. दोन्ही म्हणजे.. अंडा! आणि कुठल्या कोनातून दिसतोय तू हीरो? अंडा द एग!

अनिरुद्ध: मग?

बबन: तसा तू.. रोल मॉडेल म्हणून.. मोठा भोपळा!

अनिरुद्ध: ठीक.. आपली जुनी मैत्री म्हणून पचवतो हा घोर.. अतिघोर अपमान! पण हा दोष तुझ्या नजरेचा आहे बरे! गाजर खा! व्हिटामिन ए खा.. सुधरो अब तो! नजर सुधरी तो नसीब सुधरेगा! जय बाबा मोइनुद्दीन!

बबन: लिहीन.. मी काल काही लिहिलेय.. त्या पायावर इमारत बांधेन.. पाया मजबूत तर..

अनिरुद्ध: थोडक्यात काय बबन्या.. अडकलायस..

बबन: नाही सुचत काही.. अरे काही तरी छानसे काही घडले तर लिहू शकेन.. घडवेन काही सुंदरसे.. असे की ज्यात चित्तरंजन होईल आणि त्या भावभावनांच्या कल्लोळाचा उमटेल एक चढता आलेख.. अलगद.. सहज.. पिसांसारखे सोनसळी शब्द कसे आपोआप येऊन बसतील माझ्या कोऱ्या कागदांवर.. बघ.. दाटीवाटीने.. मग शब्दच करतील भांडण.. मला जागा दे.. जागा दे म्हणून.. मग माझ्या लिखाण रथाचे चाक फसेल त्या द्वंद्वाच्या कर्दमात..

अनिरुद्ध: तिथे मग मी असेन तुझा कृष्ण.. रथचक्र उद्धाराया!

बबन: डोंबल.. कृष्णा.. तू माझ्या फसलेल्या रथाचे चाक काढण्याऐवजी जर तीर चालवलास तर..

अनिरुद्ध: बस क्या.. एकतर कृष्णाने नाही चालवला बाण.. आणि ये ही क्या दोस्ती? आणि तू म्हणतोस ते खरे आहे.. घडवून आण काही.. आणि उतरवून टाक तुझ्या गोष्टीत.. कुठे अडकलेय सांग तुझ्या गाडीचे चाक? तू म्हणतोस ते खरेच.. अ अ म!

बबन: यस्स.. अवलोकन.. अनुभव आणि मनोव्यापार!

*प्रवेश दुसरा*

तीच रूम. थोडा बदल.. तारीख पाच मार्च

अनिरुद्ध: काय लेखकराव.. करताय काय  डराव डराव?

बबन: लिहिलेय मी.. ऐक हां..

ऐक.. समज अ आणि ब बोलताहेत..

अ: मना सज्जना भक्ती पंथे न जावे

ब: जा की नको जाऊस.. तू आहेस माऊस ..

अ: तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावे

ब: असतो एकेकाचा स्वभाव.. सोडून द्यावे आपण..

अ: सोडून कसला देतोस.. पाहिले नाहीस श्रीहरीना?

ब: कोण श्रीहरी?

अ: तुला नाही ठाऊक?

ब: नाही.. पण तू असे श्लोक चुकीचे का म्हणतोस?

अ: चुकीचे नाहीत.. एकदम बरोबर..

ब: कसे काय?

अ: भक्ती.. ती घाऱ्या डोळ्यांची.. घारपुरे.. आणि श्रीहरी म्हणजे तिचा पैलवान बाप..! तापट स्वभावाचा राकट

ब: इसम..?

अ: नको रे.. माझ्या होणाऱ्या सासऱ्यास इसम नको म्हणूस..

ब: हुं.. भक्तीपंथे न जाता ससुर ससुरा कैसे बन सकत है?

अ: अरे वहीच तो प्रश्न है.. भक्तीपंथे तर जायचेय.. पण तिथे पैलवान..

ब: तू ती लहान मुलांची गोष्ट वाच.. खजिना तर आहे पण त्यावर पहारा आहे तो नागराजाचा.. खजिना कसा मिळावा?

अ: अगदी बरोबर.. हुशार आहेस!

अनिरुद्ध: अगदी आपण दोघे बोलताहोत असे वाटते.

बबन: ती संवादलेखनातील ताकद आहे समज!

अनिरुद्ध: फक्त अ आणि ब ची अदलाबदल झालीय

बबन: हुं..

अनिरुद्ध: हुं.. म्हणजे हे सत्यवादी.. वास्तववादी आणि इतपत खरी असेल गोष्ट तर ही भक्ती? ती पण सत्य आणि तिचा श्रीहरी? तो ही सत्य? आणि पैलवानी? ती तर सत्यच असावयाची!

बबन: हुं..

अनिरुद्ध: हुं काय? आणि ही ती एसवायची भक्तीच तर नव्हे?

बबन: हुं..

अनिरुद्ध: च्यायला! एका गोष्टीसाठी तू असला घारपुरी प्रयोग करून बसलास? सत्यातली गोष्ट लिहावयाची म्हणून..

बबन: अनुभव आवश्यक असतो ना! अवलोकन करून करून किती करणार?

अनिरुद्ध: मग आता पुढचा पण घेऊन टाक अनुभव!

बबन: म्हणजे?

अनिरुद्ध: म्हणजे काय.. मनोव्यापार! शोधून शोधलीस ती पैलवान बापाची पोर..

बबन: अरे दॅटस अनफेअर यार.. एक तर तू म्हणालेलास.. प्रत्यक्ष अनुभव घे..

अनिरुद्ध: म्हणून असा?

बबन: आणि तुला माहिती नसेलच म्हणून सांगतो.. यू डोण्ट चूझ युवर एफआयएल..

अनिरुद्ध: हे कोण नवीन पात्र?

बबन: पात्र नव्हे.. फा इन लॉ.. तर समजा जेव्हा केव्हा तू अशा भानगडीत पडशील तेव्हा.. तू पहिल्यांदा तिच्या बापाची परीक्षा घेशील? की तो कसा पाहून मग?

अनिरुद्ध: ते मी माझे पाहून घेईन.. आम्ही आमचे व्हायचे ते होऊ देतो.. पण एका लिहायच्या काल्पनिक गोष्टीसाठी असले नसते प्रयोग सत्यात करत बसत नाही.. समजलास?

बबन: हुं.. एका विशिष्ट संवेदनेने धडकत धडकत आजूबाजूच्या सुखदुःखाच्या कहाण्या स्वतःच्या समजत, आपल्या हृदयातून ओघळत ओघळत नि पाझरत पाझरत आलेल्या भावभावनांच्या आणि या सामान्यातिसामान्यांच्या काळजाला भिडणाऱ्या कथा लिहिण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणि त्या लिहीण्यासाठी असले प्रयोग करणाऱ्या आणि त्यासाठी एका पैलवानाशी पंगा घेऊन जिवाची बाजी लावून लिहिणाऱ्याला तू असले नुसते आणि नसते प्रयोग करणारा म्हणतोस.. ते ही अवलोकनातून अनुभव.. आणि मनोव्यापारातून विश्लेषक वृत्ती जोपासणाऱ्या माझ्या सारख्या वास्तवाचे अवास्तव भान असणाऱ्या लेखकास?

अनिरुद्ध: ( उठून पाण्याचा ग्लास देत ) हे पाणी घे राजा.. दोन घोट.. किती मोठे तुझे स्वगत! नक्की तू नाटक्कार होशील.. आणि नाटककार नाही.. ना..टक्का..र!

बबन: तू कितीही हिणवलेस तरी न बधणारा लेखक आहे मी. कवीच्या खालोखाल देवाचे लाडके असणारे आम्ही..

अनिरुद्ध: तयार रहा..

बबन: कशाला?

अनिरुद्ध: तेच.. लाड करणाऱ्या देवास भेट.. श्रीहरी कृपेने .. आणि काय!

बबन: शुभ बोल नाऱ्या तर म्हणे.. भक्तीपंथेची जाण्यासाठी मदत करण्याऐवजी माझ्या नेक इराद्यात असले भयाचे बेडूक सोडणाऱ्या चांडाळा.. कुठे फेडशील हे पापाचे इएमआय..?

अनिरुद्ध: सुलभ हत्यांत..

*प्रवेश तिसरा*

स्थळ: तीच खोली. तारीख १० मार्च. भक्ती आणि बबन दोघे आहेत. भक्ती साधारण विशीतली कॉलेजकुमारी.

बबन: काय गं हे.. आता पुढे काय?

भक्ती: अय्या! मला काय माहिती? पण बापू नाही ऐकायचे. त्यांना पाहिजे जावई त्यांच्या सारखा.

बबन: म्हणजे? काळाकभिन्न?

भक्ती: मी रागावेन हां.. बापूंची मस्करी नको.. लहानपणापासून तळहातावरील फोडासारखी जपलीय मला त्यांनी..

बबन: फोड? कसली पेरूची की आंब्याची? आणि जपून जपून किती? एकदा पेरू चिरला तरी काळा पडतोच तो..

भक्ती: अय्या! हे काय? छे.. काहीतरीच!

बबन: 'तो' फोड होय.. मला वाटले 'ती' फोड!

भक्ती: मी बोलणारच नाय्ये तुझ्याशी.. मी निघते. परत बोलायला येऊ नकोस..

बबन: अरे बापरे! सॉरी.. कान पकडून सॉरी.. उठाबशा काढू? की कोंबडा बनू?

भक्ती: तू काही नको बनूस.. मी निघाले.. परत नको येऊस..

बबन: नको रागावूस.. नको असा घुस्सा ..अस्सा किंवा तस्सा.. तेरे मेरे प्यार का दुनिया सुनेगी किस्सा..

भक्ती: मग परत नाही करणार थट्टा बापूंची?

बबन: नाही गं राणी.. पण पुज्य बापूजींचे मन जिंकण्यास काय करावे?

भक्ती: अय्या! सोप्पय.. आखाडा.. आखाड्यात उतर.. लाल मातीत! शड्डू ठोकून! पैलवानीला पर्याय नाही! आणि यात माझ्या आतेचे पण ऐकणार नाहीत ते..

बबन: आते? ही कोण ते?

भक्ती: अय्या! आई!

बबन: आईला आत्या म्हणतात तुमच्याकडे?

भक्ती: आत्या नाही.. आते! तशी पद्धत आहे आमच्याकडे. बापू लहान होते तेव्हा..

बबन: ( वाक्य तोडत ).. पण पैलवानी करायचे?

भक्ती: परत तू तशीच थट्टा करायला लागलास..

बबन: सॉरी.. आता वेगळी करेन.. सॉरी..

भक्ती: तर बापू लहान होते तेव्हा त्यांची आई गेली. त्यांच्या आत्यानी सांभाळले त्यांना. ती आते म्हणून मी पण आईला आते म्हणते.

बबन: ते ठीक.. पण आता पैलवानी? हातपाय तुटायचे.. लेखकाला लाल मातीत पाडून त्याच्यातला लेखक गाडून टाकायचा काय?

भक्ती: काय हरकत आहे? या मातीतल्या गोष्टी लिहीशील मग तू..

बबन: काही असतात मातीतल्या गोष्टी लिहिणारे म्हणून काय पैलवान गिरी करू?

भक्ती: आता बापूंची तीच अट असेल तर.. नाइलाज आहे!

बबन: हुं.. नाइलाज को क्या इलाज! अनुभवच घ्यायचा तर.. आणि मनोव्यापार..

भक्ती: तू काय बोलतोस ते नाही समजत.. व्यापार कसला करतोयस?

बबन: जाव दे..व्यापार नाही.. पण 'नन ऑफ माय बिझिनेस'ही नाही म्हणता येणार!

*प्रवेश चार*

तीच खोली. तारीखही तीच..

अनिरुद्ध: काय म्हणाल्या ताई?

बबन: कोण? भक्ती?

अनिरुद्ध: आणि कोण?

बबन: पैलतीरी नय्या घेऊन जाण्यास पैलवानी हा एकच उपाय!

अनिरुद्ध: म्हणजे?

बबन: लालमातीत उतरून शड्डू ठोकून कुस्तीचे डाव जिंकल्याशिवाय पैलवान मानणार नाहीत..नुसते नाहीत.. पुज्य पैलवान!

अनिरुद्ध: वा! एकदम पूजाबिजा करायला लागलायस..

बबन: अरे.. गंमत झाली. बापूंची थट्टा पचत नाही भक्तीला

अनिरुद्ध: बापू? हूज द्याट न्यू कॅरॅक्टर?

बबन: कॅरॅक्टर! यू आर्राइट! पैलवान श्रीहरी!

अनिरुद्ध: ओह!

बबन: तर म्हणून मी व्याकरणात्मक व्यूहरचना करण्याचा व्यवहार्य निर्णय घेऊन त्यांच्या अपमानाची व्यवस्थित व्यवस्था केली! आहे की नाही व्यवस्थापनात्मक व्यूह?

अनिरुद्ध: तुझ्या व्यामिश्र बोलण्याने व्योमात मेघ गर्दी करतील.. तुझे म्हणणे काय? व्याकुळतेने विचारतोय.. व्याकरण काय नि व्यूहरचना काय.. वेळेचा व्यय व्यर्थ..

बबन: अरे पुज्य बापू.. पु पहिला त्यातला!

अनिरुद्ध: म्हणजे?

बबन: पु पहिला.. पुज्य .. म्हणजे शून्य! भक्तीला इतके भाषेचे बारकावे थोडीच आहेत ठाऊक! ती व्यवस्थित यात फसली! तिच्यासाठी पूज्य आणि माझ्यासाठी पुज्य बापूजी..

अनिरुद्ध: वा! फारच व्यवहार चतुर! तर पुढे काय? पैलवान काय म्हणतात?

बबन: कठीणै! पैलवानास पैलवानच हवा जावई!

अनिरुद्ध: वा!

बबन: वा? परदु:ख शीतल?

अनिरुद्ध: आता ही शीतल कोण?

बबन: नाही.. ती कुणी नाही.. अरे भक्ती म्हणते लाल मातीत उतर आणि त्यातच आहे उत्तर!

अनिरुद्ध: सापडला! उपाय सापडला!

बबन: कशावर?

अनिरुद्ध: तुझ्या गोष्टीवर!

बबन: कसला?

अनिरुद्ध: बब्बन शेर .. जालीम उपाय! अति जालीम उपाय! अक्सीर इलाज! लेखकराव! आजवर आपल्या गोष्टी लिहिण्याकरिता तडप तडप तडफडणारे

लेखकराव.. आपल्या मातीतील गोष्ट लिहायला अनुभव हाच गुरू! एकदा मातीत मिसळून पहा.. करा आपलेच मनोविश्लेषण

बबन: म्हणजे?

अनिरुद्ध: तुला नाही कळणार.. सोप्या भाषेत सांगतो.. आपल्या मातीतील वास्तव अन सत्यवादी कहाणी.. लिहावयाची असेल कथा नि मनची व्यक्त करावयाची व्यथा तर.. अनेक पाळून व्यवधाने.. उतरावे लागेल या आखाड्यातल्या मातीत! अंगाला लागेल जेव्हा माती लाल.. मग बघ या मातीतल्या गोष्टीची कमाल! नुसत्या अवलोकनातून नाही प्रकटणार असली अस्सल गोष्ट! लाल माती लागली ना अंगास की फुटतील त्यातूनच गोष्टीचे कोंब! तरारून येतील अस्सल मातीतल्या व्यथांच्या कथा!

बबन: डोंबल तुझे! हाडे मोडून कुठे गोष्ट सुचणारे? मातीतल्या गोष्टीसाठी मातीत मिळवशील मला?

अनिरुद्ध: हेच! दुटप्पी! जेव्हा अडकली प्रेमकथा तेव्हा सोयीस्कर पडलात मागे.. भक्तीताईंमागे भक्तीमार्गावर! आणि आता? मातीतील गोष्टीसाठी नुसते अवलोकनच? इथे नको अनुभव?

बबन: तू माझ्या बाजूने आहेस की विरूध्द?

अनिरुद्ध: जैसा भी समझ! पण मातीतल्या खड्ड्या खड्ड्यात मिसळून जाशील तेव्हाच बनतील कथांच्या रोपवाटिका!

बबन: खड्डे? जा खड्ड्यात!

प्रकाश बबन वर. मागे अनिरुद्ध थिजून बसलेला

बबन: (स्वगत)

टू बी ऑर नॉट्टूबी?

दॅट्स द क्वेश्चन!

माझ्या मायमराठीत सांगायचे तर हसावे की रडावे? हाच प्रश्न आहे!

आज हा म्हणाला मातीत मिसळ.. मिसळू? मातीत ते पसरू अतिरम्य पंख! मा.. माटी आणि मानुष.. किती अमानुष! कोण्या राजकीय पक्षाची घोषणा ही! असेल!

पण हा अन्या म्हणतो ते खरेच असावे का?

अन्या?

कोण तो? ज्यास ना लिहिता येते ना त्याचे कोणाशी सुत जुळले.. जुळळे.. नाही जळळे ते लक्षण! तो अनुभवहीन या सर्वांसाठी सल्लागार? सेल्फ अपॉइंटेड ॲडवायझर?

अरे जा!

इतक्या तितक्यासाठी तुझ्या सल्ल्यावर नाही मी अवलंबून.

कारण..

मी आहे सृष्टीतील नवनिर्माण करणारा. माझ्या इच्छेने माझी पात्रे चालतात नि बोलतात. माझ्या इच्छेने सारे काही होते. इच्छेने नाही.. इच्छेनेच.. सारे काही होते. माझी पात्रे म्हणजे माझ्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या. कठपुतळया! त्यांच्या तालावर मी नव्हे.. तर माझ्या तालावर त्या नाचतात. मी म्हणेन तशी वागणार पात्रे.. कितीही 'पात्रच आहे एक' म्हटलात तरी आणि कितीही कुठल्याही गोष्टीस पात्र असले तरी.

कारण..

कारण.. मी आहे त्यांचा निर्माता.

मी आहे त्यांची दोरी हलवणारा.

कितीही या लोकांनी वागावयाचे म्हटले वाकडे वा तिकडे, तरी मी म्हटल्यावाचून हलणार नाही त्यांचे पान!

याचे पात्रांनो ठेवून असा भान! आणि जे ठेवतात भान.. होत नाहीत बेभान.. त्यांनाच मिळतो मान!

तर श्रीहरी ..

श्रीहरी पैलवान..

तुमची मिजास माझ्या लेखणीपुढे उतरणार!

कारण..

मी ठरवले तर तुम्ही कुस्तीतले पेच काय लढवणार..

मोठमोठे मल्ल काय लोळवणार..

माझ्या एका लेखणीच्या फटकाऱ्यानी एका अजस्त्र देहास पाडू शकेन मी असहाय अवघडलेल्या अवस्थेत एका कुठल्याशा कोपऱ्यात अनभिज्ञ! मग कसली मिजास नि कसला तोरा! येईल मग ती भक्ती माझ्याकडे मागत भीक प्रेमाची. मोठ्या मनाने देईन मी ती.

भक्ती काय!

शक्ती काय!

सारे काही आहे माझ्या हातात. माझ्या हाती आहे ब्रह्मांड.. माझ्या ह्या बोरूच्या फटकाऱ्यात आहे सर्वांचा मोरू करायची ताकद!

आणि अन्या म्हणतो..

अवलोकन नाही..

प्रत्यक्ष अनुभव हवा!

घेऊ की न घेऊ हा अनुभव!

अरे, मातीत लोळवायला निघालास मला. लोळेन ही..

पण ह्या पात्रांना लोळवून.

या पैलवानास चारी मुंड्या चीत करीन तरच नावाचा बबन्या!

आणि मग..

आणि मग करेन या नगाच्या मनोव्यापाराचे विश्लेषण..

हाय रे!

बबन्या.. बबन्या.. बबनराव..

किती बोलशील?

बालिस्टरच झाला जणू..

लेखणीच्या टोकावर आले शब्द नि टाकले उतरवून!

उतरवा.. उतरवा!

पण शब्द नाहीत.

तर जरा उतरवा विमान जमिनीवर.

उघडा डोळे बघा नीट.

ग्राउंड रियालिटी!

ग्राऊंड!

द्यॅट साऊंड्स लाइक माती..

अगेन!

माती असशी.. मातीत मिळशी!

जटिल.. जटिल कठीण किती..

कथालेखका.. विचार कर!

कथानायका.. तू ही कर विचार!

कथानायक म्हणजे..?

मीच..

मी आहे मोहिते..

मीच आहे बबनराव..

मीच आहे घडता घडविता..

बेडूकराव.. नाही नाही..

लेखकराव..!

*प्रवेश पाच*

तारीख बारा मार्च
तीच खोली..

अनिरुद्ध: काय मग बबन्या.. सुटला का तिढा? सुटला असेल तर दे एक पेढा!

बबन: कशाला तो सोस? सोसत नाहीत नि कविता करायला जातोस? यमक जुळत नाही राजा! आणि पेढे कसले खातोयस.. इथे डोके फिरायची वेळ आलीय! मस्तिष्कचक्कर!

अनिरुद्ध: होणारच! मस्ती केलीस तर चक्कर येणारच! मस्तिष्क चक्करणारच!

बबन: अरे विचार करून पडतोय डोक्याचा भुगा.. भुंगा पोखरतो तसा पोखरतोय माझे डोके हा विचार! इतके कठीण असावे कथा लेखन? आजवर इतक्या पाडल्या..

अनिरुद्ध: पाडल्या?

बबन: होय.. झाऱ्याने बुंदी किंवा सोऱ्याने चकल्या पाडाव्यात.. जिलेबीची वेटोळी तापल्या तेलात टाकावीत.. आणि तळणानंतर खरपूस काढावेत जिन्नस तशा खरपूस कथा! नुसत्या कल्पनाशक्तीच्या बळावर. आणि आज वास्तववादी म्हणून अनुभवसिद्ध लिहावे म्हणून बसलोय तर.. अवलोकन.. निरीक्षण.. बस्स! प्रत्यक्ष अनुभव कशास हवा?

अनिरुद्ध: तूच बोललेलास बाळा.. अवलोकन, अनुभव आणि मनोव्यापाराचे ज्ञान..

बबन: मी लाख बोललो असेन.. पण तू हलवून का केलास खुंटा बळकट?

अनिरुद्ध: म्हणून चूक माझीच.. मर्कट?

बबन: मर्कट? बिन शेपटीचा? अरे यमक नुसते जमते म्हणून करू नये जुळणी.. शब्दांनाही लावावी लागते अर्थाची चाळणी! ते सोड.. फसलो मी या प्रेम दलदलीत! जितका बाहेर पडू पाहतो तितका अधिक रूतत जातोय आत आत! कर्णाच्या रूतलेल्या चाकासारखा.. एकदा माझ्यातला कथा लेखक वरचढ झाला नि म्हणाला, हॅट.. मीच नाचवतो पात्रास.. पात्रे नाही मला नाचवू शकत.. पण वास्तववादी लिहू म्हणता आले वास्तवाचेच भान.. वाकली मान.. म्हटले काही खरे नाही गड्या! ना मातीत उतरणे.. खरे ना..कसे सुटावे कोडे नि हे अजब गणित?

अनिरुद्ध: थांब.. वत्सा! कुठल्याही प्रश्नास उत्तर असते आणि असतेच. आणि हे काही गणित नाही.. यास एकाहून जास्त उत्तरे असू शकतात.. तीही एका वेळी सारी बरोबर असू शकतात.

बबन: म्हणजे रे?

अनिरुद्ध: म्हणजे.. उत्तर शोधा म्हणजे सापडेल!

बबन: कोड्यात नकोस बोलू..

अनिरुद्ध: अरे.. नाव काय तिचे?

बबन: विसरलास इतक्यात? अर्थात भक्ती!

अनिरुद्ध: त्यात आहे उत्तर दडलेले!

बबन: म्हणजे? ईश्वरभक्ती करू.. प्रार्थना? म्हणजे दवा नहीं.. दुवा की जरूरत है म्हणतोस? इतकी केस गेलीय हाताबाहेर? की तप करायला बसू?

अनिरुद्ध: छट.. ऐक.. दुवा नाही नि दवा नाही.. भक्ती! तीच

बबन: निर्गुण निराकार?

अनिरुद्ध: नाही.. सगुण.. साकार! जीती जागती आणि हाडामांसाची! तीच भक्ती! कळले का तुला?

बबन: नाही..

अनिरुद्ध: नाही? त वरून तपेली तला ताकभात कळत नाही? अरे, त्या भक्तीलाच सांग.. पैलवानास लोळवायला!

बबन: म्हणजे?

अनिरुद्ध: अरे तीच करेल आपल्या बापास मॅनेज.. अन्यथा तुला कोल्हापूरला तालमीत नाव घालावे लागेल!

बबन: म्हणजे?

अनिरुद्ध: म्हणजे एवढेच की जे तुला नाही शक्य ते तीच करू शकेल. एक बाप आपल्या मुलीच्या मनाविरुद्ध कसला जातोय? फक्त त्याच्या मुलीने व्यवस्थित सारे हाताळले तर..

बबन: म्हणजे बापाचे मनोव्यापार म्हण की! हुं.. कळतंय मला! ऐक मला काय वाटतेय ते.. माझ्या मना बन दगड! कर विचार नीट.. बनून आता धीट! भक्ती मध्येच असते शक्ती! तेव्हा करावी ही युक्ती. गोष्टीतल्या गोष्टीत नि प्रत्यक्षही! पैलवानास लोळवायला भक्तीच हवी.. शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ आणि युक्तीपेक्षा भक्ती! तेव्हा.. भक्ती तुझी भक्ती करणे आले..

अनिरुद्ध: शाबास! आता कळले सारे तुला! वत्सा.. तुजप्रती कल्याण असो..

बबन: प्रणाम अनिरूध्द बाबा ऊर्फ अन्याबाबा! अन्याबाबा की जय हो! आपल्या कृपेची छत्रछाया राहू दे शिरी!

अनिरुद्ध: आशीर्वाद आहेत आमचे वत्स!

*प्रवेश सहावा*

स्थळ: होस्टेलची तीच खोली
तारीख: चौदा मार्च

अनिरुद्ध: भक्ती, नाही भक्ती ताई.. आमचा बबन्या कसा वाटतो तुम्हाला?

भक्ती: अय्या! बबन्या काय? बब्बू म्हणते मी त्याला! ( लाडात येत ) बब्बू.. बब्बू..!

अनिरुद्ध: तर बब्बू कसा वाटतो तुम्हाला?

भक्ती: अय्या! तुम्हाला काय? तुला.. मी जस्ट सेकंडला आहे

अनिरुद्ध: बरं.. तुला बब्बू कसा वाटतो?

भक्ती: अय्या! वाटायचा काय.. चटणी बनवायची आहे की काय पाटा वरवंट्यावर? पण मस्त.. गोड चटणी बनेल..

अनिरुद्ध: म्हणजे.. बब्बुवा गोड आहे म्हणता?

भक्ती: अय्या! असे कुठे म्हटले मी?

अनिरुद्ध: मग चटणी गोड बनेल म्हणतेस ती?

भक्ती: अय्या! ते होय! ते असेच! तर तुम्ही काय म्हणत होतात?

अनिरुद्ध: आमचा बब्बू तुम्हाला.. नाही तुला कसा वाटतो?

भक्ती: अय्या.. आम्ही नाही जा! आणि तुमचा बबन आणि माझा बब्बू!

अनिरुद्ध: छान! आपला तो बब्बू इतरांचा बबन? ते राहू दे.. तर.. तो येण्याच्या आधी.. ऐका.. नाही ऐक.. तो काही पैलवान बनू नाही शकणार..

भक्ती: म्हणजे?

बबन: म्हणजे.. त्याच्यात ते गुणच नाहीत.. उद्या नाजूक साजूक शब्दांत गुलाबजाम सारख्या गोड गोड कविता करणाऱ्या कवीला उतरवले आखाड्यात तर काय होईल?

भक्ती: अय्या! मला काय माहिती?

अनिरुद्ध: नाही ना.. मग ऐक..आमचा बबन म्हणजे तुझा बब्बू.. कुस्तीच्या आखाड्यात उतरला तर हाडे तोडून परत येईल आणि हे हाताचे हाड तुटले तर..

भक्ती: थांबा.. तुमच्या जीभेला काही हाड?

अनिरुद्ध: अरे वा! अय्या शिवाय वाक्य बोलता येते तुला?

भक्ती: अय्या! म्हणजे काय? अर्थात येते.. अय्या! काहीतरीच हां अनिरूध्द!

अनिरुद्ध: तर हाताचे हाड मोडले तर लिहीण्याच्या लायकीचा ही नाही राहणार!

भक्ती: अय्या! किती निर्दयीपणे सांगताय तुम्ही! पण बापू ऐकायचे नाहीत ना! बब्बू.. तू आहेस कुठे?

(बबन येतो)

बबन: काय झाले राणी.. का मारलीस अशी आर्त हाक..

भक्ती: बब्बू.. माझ्या बबुड्या.. बब्या

बबन: बोल माझ्या चिमण पाखरा..

अनिरुद्ध: डोण्ट टेल मी.. तुम्ही असले डायलॉग बोलता! बाल प्रेमकथा वाटतेय..

भक्ती: बब्बू तू नको लक्ष देऊस.. कबाब में कढीपत्ता आहेत हे!

अनिरूद्ध: कबाब में कढीपत्ता?

भक्ती: ऑफकोर्स! कढीपत्ता कुणी खातात का? त्याला काढून बाहेर ठेवतात ना.. तसा!

बबन: आणि आम्ही प्युअर व्हेज आहोत ना म्हणून हड्डी बिड्डी नको..

भक्ती: अय्या बब्बू.. किती रे छान बोलतोयस? पण पैलवान बनायला रोज दोन लीटर दूध पिशील ना.. चरवी तून?

बबन: आयला! दोन लीटर? म्हणजे रोजचे शंभर रूपये?

अनिरुद्ध: शंभर कसले.. एकशे वीस! आणि मग जेवणात ..

बबन: ते जाऊ देत.. भक्ती.. ऐकना.. हे काही जमण्यातले नाही.. दोन लीटर दूध.. परत त्यावर व्यायाम.. अगं दोन वेळा धावलो की धापा टाकतो मी! कितीही फुगला तरी बेडूक बैल बनेल काय?

भक्ती: अय्या! तू बेडूक आहेस का? म्हणजे तुला जादूने राजकुमार बनवले का कुणी चेटकीणीने?

अनिरुद्ध: वा! काय प्रेमसंवाद!

भक्ती: तू बब्बू जाऊ देत.. पण आता आपण काय करणार?

अनिरुद्ध: काय करणार काय.. काय करणार? माझ्या या मित्राला.. बिचाऱ्या मित्राला म्हणूया.. माहिती नव्हते हे आधी.. तुला तर माहिती होते ना की बापूजीना हवा पैलवान.. मग का या काडी पैलवानाला दिलास हिरवा सिग्नल?

भक्ती: अय्या! मी काय रस्ता आहे की रेल्वेगाडी.. सिग्नल द्यायला. पण तुम्ही म्हणता ते खरे आहे. पण हैना.. प्यार दीवाना होता है..

बबन: अगं.. ते गाणे आहे ना.. जब प्यार करे कोई तो देखे केवल मन..

अनिरुद्ध: छे.. बब्बू.. जब प्यार करे कोई तो देखे पहिल.. वान! असे आहे ते गाणे!

भक्ती: अय्या! काहीतरीच!

अनिरुद्ध: पण है ना हे खरेच खरे आहे!

भक्ती: आता रे काय बब्बू?

अनिरुद्ध: आता काय? आधी कुठे गेली होती अक्कल?

(भक्ती रडायला लागते)

बबन: भक्तु.. रडू नकोस.. मी होईन बेडकाचा बैल..

भक्ती: अय्या.. बैल नाही.. पैलवान

बबन: नाही.. मी होईन पैल्वान..

भक्ती: अय्या खरंच? किती रे तू चांगलायस

बबन: पुढे ऐक.. असे तुला वाटते का? पैलवान बनायचे म्हणजे काय सहा महिन्याचा कोर्स बिर्स थोडीच आहे? तो ही पोस्टल? मुक्त विद्यापीठातला?

भक्ती: आता रे काय?

बबन: नाकात दोन पाय.. तू आणि तुझे बापू..स..पुज्य बापू.. बरं का अनिरुद्ध पहिला पु..

भक्ती: काय रे बब्बू.. पहिला पू म्हणजे?

बबन: काही नाही भक्तुले.. त्याला माहितीय.. त्याच्या नाकावर फोड आलेला..

भक्ती: पेरू की आंबा?

अनिरुद्ध: हे काय नवीन आता?

बबन: अरे फोड कसली विचारतेय ती! अगं तशी फोड नाही राणी.. 'ती' नाही 'तो' फोड.. त्यातून आलेला पू.. पहिल्या फोडातला पहिला पू..

भक्ती: अय्या! ते गाणे आठवले.. पहले प्यार का पहिला गम

बबन: किती हुशार गं तू राणी. तर ऐक.. काही कर पण बापूंना पटव.. पु. बापूंना! नाहीतर..

भक्ती: नाहीतर काय शोना?

बबन: शोना को पडेगा खोना! आणि काय?

भक्ती: किती रे निष्ठुर आहेस.

अनिरुद्ध: नाही. तो वास्तववादी आहे. गोष्टी पण कशा अगदी वास्तववादी.. त्यात वादावादी नाही अजिबात! आधी अवलोकन.. मग अनुभव.. मग मनोव्यापार..

भक्ती: अय्या! पहिले दोन कळले.. पण ते तिसरे.. मनो.. काहीतरी म्हणजे काय?

अनिरुद्ध: बरं का ताई, सोप्पंय.. अगदी! मनोव्यापार! म्हणजे मनाच्याही अंतर्मनात एक मन असते.. विहीरीतल्या पाण्यात उतरून त्याचा तळ गाठून त्याच्या अंतरंगात डोकावून पाहणे.. म्हणजे तिथे शेवाळ बिवाळ किती.. घसरडे किती..

बबन: भक्तु..त्याच्याकडे लक्ष नको देऊस.. ऐक, हे काम तुलाच लागेल करायला. नाहीतर तू पण हो तयार दुसऱ्या कुठल्या पैलवानाच्या लंब्या चौड्या मानेत तितकीच लंबीचौडी माळ घालायला!

भक्ती: मी काय म्हणते ना.. अजून वेळ आहे ना.. मी विचार करते..

अनिरुद्ध: म्हणजे? दुसरा कुठला भैरू पैलवानदादा चालेल त्याचा विचार?

भक्ती: चुप्प..

बबन: आतेला विचार..

अनिरुद्ध: आते? गोष्टीत हे पाचवे पात्र कोठून येते?

बबन: पात्र नव्हे.. ही रागावेल असे काही बोललास तर.. आते मीन्स हिची आई.. आमच्या सासूबाई

भक्ती: (लाजत) अय्या!

भक्ती: तर कामगिरी विसरू नकोस.. काय कसे कधी कुठे तू ठरव..!

भक्ती: बब्बू.. बबड्या.. मी करते रे शोन्या.. पण नाहीच जमले तर.. उद्यापासून कमीतकमी दूध प्यायची प्रॅक्टिस तरी सुरू कर!

अनिरुद्ध: आणि बदाम पण खा

भक्ती: अय्या बदाम! मला बाई लाज वाटते..

( जाते )

बबन: गेली.. माझी प्राणकलिका गेली.. गेली.. भक्ती.. तुजवीण नाही मुक्ती.. सखी..

अनिरुद्ध: राखी गेली म्हणू?

बबन: काही म्हणू नकोस.. तेवढे एक दूध पितो आणि..

( नाक बंद करून दुधाचे भांडे तोंडाला लावतो! घटाघटा पिण्याचा आवाज येतो.)

*प्रवेश सातवा*

स्थळ तीच खोली
दुसरा दिवस

अनिरुद्ध: काय कसे काय.. पैलवान इन मेकिंग?

बबन: सोड रे.. सकाळ पासून चारदा जाऊन आलो..

अनिरुद्ध: च्यायला! असला मनो..व्यापार! म्हणून! अरे होस्टेलला दोनच लॅट्रिन.. एक तू अडवून बसणार.. बाकी मारतील बोंबा!

बबन: मग काय करू? दूध पचत नाही त्याला?

अनिरुद्ध: कुणी सांगितले? कुणी सांगितले दुधाचे भांडे तोंडास लावायला?

बबन: अरे प्यार दीवाना होता है..

अनिरुद्ध: म्हणून प्यार दूध पीता है? आणि प्यार घटाघटा दूध पीता है? ते काही नाही.. दोघांनी मिळून रोज पाव लीटर दूध घ्यायचे.. त्यातल्या आतपावाचे पैसे मी देणार बाकी दोन लीटर पी की तीन.. फक्त बाथरुम अडवून ठेवू नकोस!

बबन: ए.. रागावू नकोस. पण काहीतरी ताकद वाढवणारे खायला लागेल.. नॉन व्हेज इज आऊट.. बदाम..नको.. शेंगदाणे.. गरीबांचे बदाम.. आणि चणाडाळ! तुला गरीबांची चणाडाळ असे काही ठाऊक आहे का? आज पासून व्यायाम एके व्यायाम!

अनिरुद्ध: वा! पैलवान बबन.. फ्रॉम काडी टू पैलवान!

बबन: बघच! हे प्रेमच मला करायला लावेल सारे.. फुगविन मी दंडातल्या बेटकुळ्या आणि वाकवीन पोलादी पहार! काय अशक्य आहे जर आपण ठरवले एकदा तर? शेक्सपियर म्हणून गेला, नथिंग इज इंपॉसिबल!

अनिरुद्ध: नेपोलियन!

बबन: तेच ते! एका विशिष्ट कालावधीनंतर सारे मोठे लोक एका सारखे एक वाटायला लागतात! म्हणजे एक शंभर वर्षांनी हा बबन मोहित्या आणि विल्यम शेक्सपियर यांच्यात गल्लत होऊ शकते!

अनिरुद्ध: वा! टीचभर ताकदीच्या टीचभर बेडका, भक्तीला त्यादिवशी सांगितलेस ना, बैल होता नाही येणार म्हणून.. ते विसरलास? आणि तुझ्या मूळ गोष्टीचे काय जिच्यासाठी ही गोष्ट मुळात सुरू झाली!

बबन: लेखक सलामत तो गोष्टी पचास! आधी लग्न.. नको डायरेक्ट लग्न नको.. पण पैलवानपदाकडे हळूहळू का होईना मार्गक्रमण करावे असे नाही तुला वाटत?

अनिरुद्ध: कर.. हळूहळू का.. जोरात कर! तू आणि तुझी काडी पैलवानी! फक्त या साऱ्यात मला घसटू नकोस!

बबन: का? अर्धी लढाई सोडून चाललास?

अनिरुद्ध: माझी आणि कसली लढाई? बेगानी शादी मे अब्दुल्ला दीवाना!

बबन: ऐक ना अब्दुल.. नाही अन्या.. त्या जिमला आजपासून जातोय.. ये की मॉरल सपोर्ट द्यायला!

अनिरुद्ध: मॉरल? अरे तुला खराखुरा फिजिकल सपोर्ट लागेल! का पै!

बबन: हे काय?

अनिरुद्ध: काय नाय काडी पैलवान!

बबन: करा टवाळी.. इथे एक निष्पाप निरागस तरुण अडचणीत आहे आणि तुझ्यासारखे मित्र त्यास चिडवत आणि डिवचत आहेत.. देवा!

अनिरुद्ध: ठीक.. तुझ्याबरोबर येईन. पण लवकर आटोप.. झट व्यायाम पट पैलवानकी!

बबन: यस.. कुठे क्रॅश कोर्स आहे का रे पैलवान बनण्यासाठी?

अनिरुद्ध: यू मीन पोस्टल?

## अंक दुसरा

*प्रवेश पहिला*

स्थळ: तीच खोली
दिवस तोच. फक्त घड्याळात संध्याकाळची वेळ

बबन, अनिरुद्ध आणि भक्ती तिघे येतात. बबनच्या पायाला बॅंडेज आहे. कपाळावर छोटी पट्टी. लंगडत चाललाय बाकी दोघे त्याला पकडून आत आणत आहेत.

भक्ती: हळू हळू शोन्या.. हे काय? अरे पुढे पहा.. अजून धरपडशील..

बबन: हुं.. पण ना ते धडपडशील आहे.. धरपड नाही..

अनिरुद्ध: वा! काय भाषा भक्त.. पाणिनीचे वंशज! इथे हाडे मोजून घ्यायची वेळ आलीय आणि हा भाषाशुद्धीकरणामागे लागलाय! आपण ना याच्या थडग्यावर लिहू.. प्राणात प्राण असेतोवर याने भाषेचा लढवला किल्ला!

भक्ती: काय हे.. अन्या भावजी? असे कसे बोलवते.. बब्बू तू पडून रहा हां.. धड.. पड.. ऊ नकोस!

बबन: हुं..

भक्ती: इथे ठेव पाय आणि चढ वर.. बेताने..

अनिरुद्ध: बेताने नाही.. वेताने.. आमचे दामले मास्तर आणायचे तशा वेताच्या छडीने काढू फोडून.. एक तुटलाय.. दुसरा पण तोडू.. सिमेट्रीकल! कुणी सांगितले पी हळद नि हो गोरा?

भक्ती: अय्या! तू हळद प्याला बब्बू.. कसा रे दुधातून की असाच?

अनिरुद्ध: मला वाटते ना या बब्बूला जरा झोपू दे. ही व्यायामाची पद्धत? तरी बरे तो डंबेल डोक्यात नाही पडला.. नाहीतर डंबेल फुटला असता.. आणि कपाळमोक्ष! डंबेल्सचा!

भक्ती: अय्या! डोक्यावर कपाळमोक्ष?

अनिरुद्ध: जाऊ देत.. तुला काय समजाऊ? कपाळ? तर बबन्या, आता ही भक्ती ही तुझी शक्ती .. कारण मी चाललो.. तुम्ही दोघे राजाराणी बघून घ्या

भक्ती: अय्या! राजाराणी!

( बोलता बोलता बबनच्या पायावर हात ठेवते.. बबन विव्हळतो..)

अनिरुद्ध: अय्या ताई, तुमच्या बब्बूच्या पायावर असा हात टेकू नका! एका ठिकाणी तुटलाय.. बॅंडेज ही अजून सुकले नाही तर जखमेची काय बात?

भक्ती: अय्या! सॉरी हां.. रंग ओला असतो तसे बॅंडेज पण असते ओले? पण बब्बू.. कशाला तू असली कसरत करायला गेलास?

अनिरुद्ध: हे पहा अय्या ताई.. काय आहे..थकलाय बिचारा! एकतर दूध पोटात रिचवून रिचवून बिचारा थकला.. मग बाथरुमच्या वाऱ्या आणि आता हे!

भक्ती: सॉरी हां.. बब्बू

अनिरुद्ध: बब्बू कसला.. असा काय पैलवान बनतो? एका दिवसाच्या व्यायामात असा कुणी बबू ..नाही बनू शकतो? काडी.. ची अक्कल नाही.. आणि काडी पैलवान!

भक्ती: अन्या भावजी.. नका हो असे बोलू कडवट!

अनिरुद्ध: सॉरी अय्याबाई.. क्रॅश कोर्स करायला गेला नि स्वतःच क्रॅश होऊन आला.. पण ध्येयाकडे वाटचाल करणारा हा माझा मित्र..

भक्ती: ( रडत ) तू जिमला नाही गेलास? ध्येयाकडे गेलेलास? ध्येया बोबडे माझ्या वर्गात आहे.. तिच्याकडे? आणि मला वाटले तू माझ्यासाठी पैलवानी..

बबन: भक्तुले.. रडू नकोस गं.. अगं तिच्याकडे मी कशाला जाईन.. आणि माझ्या तंगड्या ती कशाला तोडेल?

भक्ती: अय्या! खरंच!

अनिरुद्ध: बब्ब्या फारच कुशाग्र आणि हुशार आहे हां तुझी जीएफ... लेटेस्ट..

भक्ती: अय्या! तुला लेट होतोय? मग जा ना.. मी आहे इथे जा नू.. साठी..

अनिरुद्ध: म्हटले ना किती हुशार आहे ही.. लेटेस्ट म्हणजे लेट.. लगेच कळले तिला..

( भक्ती टेकून उभी आहे. तिचा हात बबनच्या पायावर..)

बबन: शार्प.. शार्प..

अनिरुद्ध: कोण? ही?

बबन: नाही.. तिची नखे.. भक्तुली.. तुझी नखे तू छाट.. लागतायत.. टोचतात..

भक्ती: सॉरी रे.. अय्या.. तुम्ही जात नाही भावजी?

अनिरुद्ध: जाईन.. पण हे भावजीपण कन्फर्म?

भक्ती: अय्या.. आम्ही नाही जा! मला की नाही लाज वाटते..

अनिरुद्ध: तू लाज.. मी निघतो.. बब्बू .. संभाळ रे बाबा.. बाय..!

( अनिरुद्ध जातो )

बब्बू.. शोना.. तू माझ्यासाठी इतके सारे केलेस.. मी तुझ्यासाठी काय करू?

बबन: सांगू?

भक्ती: सांग सांग ना बब्बुल्या

बबन: अगं.. हे पाय.. अनेकवचन नाही.. हा पाय.. एकवचनी.. दुखतोय.. त्याला विश्रांती..

भक्ती: म्हणजे?

बबन: ज्या देहास तो जोडला आहे ना त्याला विश्रांती.. झोपतो थोडा वेळ..

भक्ती: ओके बब्बू.. मी ना बसते इथे घालत वारा ह्या पेपराने..

बबन: नको.. पंखा आहे ना?

भक्ती: ते ही खरंच! जुन्या काळी बरे होते ना.. सेवा करायला हवा घालत बसायचे.. आता पंखे आले.. ती सोय गेली नाही? झोप तू जानू.. मी बसते इकडे टिवल्याबावल्या करत!

( मागे बबन झोपला आहे..)

भक्ती : ( स्वगत )

अय्या! काय बोलली मी? टिवल्याबावल्या?

टिवल्याबावल्या!..

तो शब्द आठवला की शाळा आठवते.. टिवल्या आणि बावल्या!

कशा जमवायचो आम्ही जोड्या!

तोड फोड जोड.. जोड्या!

एकएकी ला एक मिळेल एकेक.. राजकुमार!

ती टिवली नि हा बावल्या!

बावल्या म्हंजे.. बावळट!

हिला.. तो पहिल्या लायनीतला...

हिला तो.. क्यूटै नै..

असल्या जोड्या बनवायची मी!

आणि माझी?

अय्या!

शाळेतली नाय काय..

माझा हा आहे ना! स्वप्नातला! परिकथेतील राजकुमारा.. स्वप्नी माझ्या येशील का म्हणे! पण नुसता स्वप्नी येऊन काय उपयोग? सत्यात येशील का म्हणावे!

नाही..

मी नाही बोलणार हे..

कारण माझा राजकुमार सत्यात उतरलाय! छान छान छान! किती किती छान! मी टिवली नि हा बावल्या! मस्त पैकी बावळट! झोपलाय बघा कसा निरागस नि .. काय म्हणू?

छे!

बब्बू किती छान छान वापरतो भाषा.. म्हंजे शब्द!

ऐकत राहावेसे वाटते.

आणि लिहितो किती छान छान!

आणि मी!

निरागसच्या जोडीला सुचत नाय्ये शब्द! पण नसतात एखादीस माहिती शब्द म्हणून एवढे काय त्यात? शब्द आपल्यासाठी आहेत आपण शब्दांसाठी

थोडीच. बब्बू पण उगाच एखादा शब्द चुकला की टोचत असतो. मगाशी मी म्हंजे बोलली ना ते मुद्दाम.. हा जागा असता तर म्हणाला असता.. भत्तुले.. म्ह ण जे.. म्हण! म्हणजे जसे मला इतकेही ठाऊक नाही..? टोचलेच असते त्याने!

अय्या!

त्याला चोच आहे का पक्ष्यासारखी.. टोचायला?

किती मस्त ना!

तो पक्षी मी पक्षिण!

त्या उंच झाडावर.. झाडाच्या फांदीवर! आम्ही दोघेच. आजूबाजूला हिरव्यागार झाडीत. झाडावर फुले नि फळे लगडलीत. मग आम्ही दोघे.. चोचीत चोच..!

अय्या!

मला तर विचार करूनही लाज वाटते! पण आले कुठे कुठून मी?

हां.. तर हा टोचतोय त्याबद्दल..

चुकला एखाद शब्द तर काय आभाळ कोसळतो की पूर येतो?

पूर नाही..

बब्बू काय म्हणतो..

प्र वरून काही.. हां प्रणय..? (लाजते).. छे.. प्रलय.. प्रलयच.. तर चुकला शब्द तर काय हे जग वाहून जाणारे?

जाऊ दे.. असते अशी खोड एकेकाला.. पण आहे क्यूट ना? शांत झोपलाय बब्बू माझा!

बब्बू.. बबुड्या.. बबुटल्या..

( बबन झोपेतच..)

बबन: बापूजी.. पूज्य बापूजी.. मी जिंकलो.. मी जिंकलो.. पैलवान बबनराव! हिंदकेसरी.. पैलवान बबन.. महाराष्ट्र केसरी..पैलवान बबन.. मुंबई केसरी.. पैलवान बबन.. कॉलेज केसरी.. भक्ती मी जिंकलोय..

भक्ती: बब्बू.. बब्बू .. स्वप्न पाहिलेस का?

( बबन जागा होत..)

बबन: होय स्वप्नच ते.. भक्तुली मला का उठवलेस.. किती छान होते ते स्वप्न.. लाल मातीत मी पैलवान संभाजीस लोळवून जिंकलो.. आणि तू उठवून मला..छे.. आता काय?

भक्ती: अरे..काय रे तू.. रेकॉर्ड करून ठेवायचेस ना.. बापूंना दाखवले असते ना! बबन: वा! किती ग तू हुशार! किती छान होते..

भक्ती: अय्या! खरेच काढतोस स्वप्नाची रेकॉर्ड? कित्ती छान.. झोपतोस का परत.. मोबाईल घेऊन?

बबन: छे गं.. परत तेच स्वप्न पडण्याची काय ग्यारंटी?

भक्ती: खरंय बबुड्या.. आणि अरे स्वप्नच ते कधीतरी मोडायचेच..

बबन: भक्तुली.. किती गं गोड बोलतेस .. ऐकत रहावेसे वाटते..

भक्ती: खूप दुखतंय का?

बबन: नाही गं.. तू आहेस तर दुखणं कमी..

भक्ती: अय्या! किती गोड बोलतोस रे तू.. ऐकत रहावेसे वाटते!

*प्रवेश दुसरा*

स्थळ: होस्टेलची खोली
तारीख: सहा जुलै

> मध्ये काही महिने गेले आहेत. बबनने थोडे बाळसे धरले आहे. तशी गालफडे बसलेली पण शर्ट घातल्यावर बुजगावणे उभे आहे असे न वाटता कुणी माणूस आहे वाटावे इतपत.

अनिरुद्ध: बबन्या निघतोय रे मी. तू आहेस ना.. अय्याताई येणार आहेत म्हणाल्या

बबन: हुं.. तू का रे तिला अय्याताई म्हणून चिडवतोस?

अनिरुद्ध: चूक असेल तर सांग! अय्या! मला लेटेस्ट होईल.. म्हणजे लेट होईल.. मी निघू?

बबन: मी तुला थांबायला सांगितलेच कधी? बरे ऐक.. माझी ती गोष्ट.. पोष्टात टाक.. पाकिट घेऊन जा!

अनिरुद्ध: ओके.. गोष्ट इन पोष्ट! छान! काही म्हण.. अय्याताईचा पायगुण चांगलाय.. पाठोपाठ गोष्टींचे घाणे घालतोयस.. दिवाळीत दिवाळी आहे बब्या तुझी! माझे पोष्टात टाकायचे.. पौष्टिक कमिशन विसरू नकोस म्हणजे झाले..

बबन: हुं.. निघ की..

अनिरुद्ध: निघतो.. भक्ती येण्याआधी. उगाच ते कबाब में कढीपत्ता कशाला? विसरलो नाही अजून.. जातोय..

बबन: जा.. बाय.. दरवाजा उघडाच ठेव.. उघड्या कवाडातून.. ती येईल एखाद्या झुळुकी सारखी.. तप्त धरे वर शीतल धारेसारखी.. एखाद्या श्रावणसरी

सारखी.. आणि अंधाऱ्या खोलीत गवाक्षातून येणाऱ्या प्रकाशाच्या तिरीपीसारखी.. माझ्या सुन्या आयुष्यात एखाद्या सुरेल वाद्याचे सूर बनून.. जणू मंजुळ पावा.. किंवा सारंगीचे सूर.. आणि आणेल नवा नूर.. येशील का झणी झडकरी.. बोलवितो सत्वरी..

( भक्ती आत येते..)

भक्ती: बब्या.. बबुटल्या.. बब्बू.. मी आलीय..

बबन: वा! आलीस! आज एकदम फ्रेश दिसतेस.. काही नवीन?

भक्ती: नवीन? आज मी खूप खूश आहे..

बबन: का?

भक्ती: का काय.. आज इथे आले खूप दिवसांनी म्हणून! परिक्षेच्या अभ्यासात वेळच नाही मिळाला ना!

बबन: हो ना! मी पण कंटाळलो..

भक्ती: मी नसल्याने ना?

बबन: हुं.. बोल कशी झाली परीक्षा?

भक्ती: परीक्षा? नेहमीप्रमाणेच! मला चांगलीच पण त्या परिक्षकांना पटत नाहीत माझी उत्तरे तर माझा नाईलाज आहे.. हो की नाही बब्बू?

बबन: हो ना! तुझा नि त्यांचा छत्तीसचा आकडा.. नाही?

भक्ती: अय्या! छतीस नै कै.. पस्तीस! पस्तीस मार्क लागतात पासिंगला! पण बब्या.. वजन वाढलंय हां.. अगदी पैलवान नाही पण..

बबन: हो ना? अगं नियमित व्यायाम आणि खाणे सुधारले.. दूध नाही पण.. पचत नाही ना!

भक्ती: बब्बू आहेच हुश्शार! दूध नाही तर नाही! किती गोंडस दिसायला लागलाय..

बबन: कापूस भरल्यासारखा?

भक्ती: अय्या! अंघोळ कशी करशील मग? कापूस भिजेल ना!

बबन: ते जाऊ देत.. काय म्हणतात तुझे बापूजी?

भक्ती: बापूजी? तालमीतून वेळ मिळेल तर ना! सदा कुस्तीचा विचार!

बबन: मला की नाही एकदा त्यांचा फोटो दाखव.. म्हणजे पैलवान पाहिलेत खूप.. तसे सगळे पैलवान सारखेच दिसतात.. पण बापूंच्या जवळ जायला अजून किती पल्ला गाठायचा ते पाहता येईल ना!

भक्ती: दाखवीन केव्हा तरी.. मी काय त्यांचा फोटो घेऊन फिरते थोडीच!

बबन: ते ही खरेच.. आतेचा पण दाखव..

भक्ती: बरं बाबा!

बबन: पण तुझ्याकडे पाहून वाटत नाही तुझे बापूजी मल्लबिल्ल असतील..

भक्ती: कायतरी तुझे.. मल्ल ते आहेत..मी नाही..

बबन: ते मल्ल आणि तू मल्लिका!

भक्ती: अय्या! किती रे गोड!

बबन: गोड कसला.. मल्लिका.. तूच गोड! उद्या आणशील?

भक्ती: काय?

बबन: काय काय.. फोटो?

भक्ती: कुणाचा रे..

बबन: कुणाचा काय.. बापूजी..

भक्ती: हां.. शोधते..

बबन: काय शोधते?

भक्ती: अरे.. फोटो..

बबन: कुणाचा?

भक्ती: कुणाचा काय.. पैलवान..

बबन: हां.. बापूजी.. त्यांचा.. शोधायला कशाला पाहिजे? असणार ना लंगोटीतला.. हातात गदा घेतलेला..

भक्ती: असणार.. हुं.. असायला हवा..

बबन: हवा? म्हणजे..

भक्ती: काही नाही रे .. बापूजी फोटो नाही काढू देत ना!

बबन: आयडिया! आपण गुगल सर्च मारू.. पैलवान फेमसच असणार.. त्यात पदकंबिदकं जिंकले असणार तर..

भक्ती: ए.. बापूजी बापूजी काय रे.. मी इतक्या दिवसांनी आली तर तू बापूंच्या फोटोला घेऊन बसलास? काही प्रेमाच्या गप्पा माराव्यात तर..

बबन: आयला! मला वाटले बापूजींबद्दल विचारले तर तू खूश होशील.. तू तर.. छे हे मनोव्यापाराचे सूक्ष्म ज्ञान.. कठीणै..

भक्ती: तुला ना मुलींचे मनच नाही कळत.. मी जाते कशी..

बबन: ए.. भक्तुली.. बाहुली.. सखू .. रागावू नकू..

भक्ती: हुं..

बबन: रागावलीस..

भक्ती: नाही.. खूप खूश झाली..

बबन: असं काय करतेस.. राहिले..

भक्ती: तू तुझे सारे काही लिहिण्याकरिता वापर.. नुसती नावापुरती मल्लिका.. एवढ्या दिवसांत भेटली.. नि गप्पा मारतो कसल्या..? तर फोटो पाहिजे.. कुणाचा? तर सासरेबुवांचा.. काय प्रेमिक.. धन्य धन्य.. ही मी चालले..

(रागारागात पाय आपटत निघून जाते.. ती जात असतानाच अनिरुद्ध आत शिरतो..)

अनिरुद्ध: काय रे? काय झाले.. ही अशी फणफणत का गेली? पाय आपटत?

बबन: काय सांगू रे.. चूक माझीच असणार बहुतेक.. अरे मला वाटले बापूंची.. तेच पुज्य.. पहिला पु.. आणि तिच्या आईची चौकशी केली तर ती खूश होईल.. झाले भलतेच.. ती रागारागात तणतणत आणि फणफणत गेली निघून!

अनिरुद्ध: अहो.. भाषा कोविद..गोविंद गोविंद.. भजन करावे पंडित.. इतक्या दिवसांनी ती आली आणि तुम्ही बोललात काय.. तर पहिल्या पुंचे फोटो? काय हे?

बबन: तुला नाही काडीमात्र अनुभव आणि शिकवतोस मला..

अनिरुद्ध: जाऊ दे.. राहिले. आता भेटशील तर आजी आजोबा.. पणजोबा.. झालंच तर खापर पणजोबा.. सगळ्यांचे माग फोटो! प्रेमवीरा! गंजली का तुझी तरवार? ज्या मुखातून प्रियेचे यावे नाव.. आणि प्रेमाचा व्हावा जप.. त्यातून असल्या.. जाऊदेत.. कुठे गेला तो तुझा रोमँटिसिझम? का म्यान झाल्या ढाली?

बबन: ढाली? आणि म्यानेत? म्यानेत असते ती तलवार!

अनिरुद्ध: एवढे कळते ना भाषाभास्कर! मग गप्पा कसल्या माराव्यात हे नाही कळत? पुस्तकी कीड्या..

बबन: तू म्हणतोस ते खरे यार.. चुकले.. कानाला खडा! ती म्हणून काढत नाही नाव तोवर.. कटाप.. बापूजी.. पहिले पुज्य!

अनिरुद्ध: जा.. ती असेल अजून खाली.. मना उसको..

बबन: खरेच.. जातो रे..

(लगेच निघून जातो)

अनिरुद्ध: अरे चप्पल तर घालून जाशील.. काही खरे नाही बरे..( गातो )
(एका लुकड्याची ॲक्शन करत) प्रेमवीर आम्ही प्रेमवीर..
(एका जाड्याची ॲक्शन करत)
म्हणे प्रेमवीर आम्ही प्रेमवीर!
तिच्यासाठी आम्ही आता
करतो कसरत सारी
त्याच्या साठी मेहनत बिहनत
गंमत जम्मत न्यारी
प्रेमवीर आम्ही प्रेमवीर..

वाढता वाढता वाढू
आणि भेदू सूर्यमंडळ
सत्राणे अठ्राणे हुंकार वदनी
वा हाती धरू कमंडल

प्रेमवीर आम्ही प्रेमवीर..

घरचे झाले थोडे थोडे
व्याह्याने धाडले घोडे
दंड बिंड फुगवू तट्ट
त्यात हाडूक ना मोडे..
प्रेमवीर आम्ही प्रेमवीर..

लेखणीतच ती ताकद आहे
सारे सोडूनिया या पाहे
एका प्रियतम प्रियेसाठी
बिनचप्पलचा धावे..
प्रेमवीर आम्ही प्रेमवीर..

अवलोकन पुरत नाही
अनुभव करूया गोळा
मनामनाच्या तऱ्हा तऱ्हा
मोजून बघूया सोळा
प्रेमवीर आम्ही प्रेमवीर..

*प्रवेश तिसरा*

तीच खोली.

तारीख पुढल्या दिवसाची

अनिरुद्ध फोन वर आहे. बबन बाजूला झोपलेला.

पलिकडे कोण असावे याचा अंदाज न यावा असे बोलतोय

अनिरुद्ध: हुं..

म्हणाला.. .

हो ना! छान केलेस! तो ना..

हां..

पण तू दाखवून टाक ना..

कुणाचा काय..

नाही माझे ऐक..

तोच.. बिनधास्त..

काय?..

नको नको..

अजिबात नको..

मुश्किल होईल. असंच कर तू..

लवकर.. काय आहे काही सुगावा.. नाही.. हो..

ढाराढूर..

नाही..

कल करे सो आज.. आज करे सो अब!.. मी? नाही..

काम आहे..

मी अहे ना..

हो ना!.. लगेच.. शुभस्य शीघ्रम

शुभा..? नाही.. शुभस्य

बाय..

(बबन झोपेतून जागा होत..)

बबन: अन्या, सकाळ सकाळी काय रे कटकट..

अनिरुद्ध: कोणाची? माझी?

बबन: नाहीतर इथे आहे कोण? तूच.. वाजले किती?

अनिरुद्ध: ॲक्रा

बबन: काय अकरा? मला उठवले नाहीस ते?

अनिरुद्ध: होय.. म्हणजे वाजतील.. थोड्याच वेळात..

बबन: म्हणजे किती वेळ आहे?

अनिरुद्ध: जास्त नाही.. फक्त एकशेवीस मिनिटांत.. वेळ जायला किती वेळ लागतो.. मला वाटते.. दोन तास लागतील फक्त..

बबन: अन्या बोअर नकोस करू.. आता जाणारे मी.. डेट म्हणजे खजूर यार! भक्ती भेटणारे.. दहा वाजता.. यस्स..काल भेटली नाही. कसाबसा फोन उचलला.

मग आज भेटतेय तेव्हा थोडा घुस्सा थंड करतो.. आईस्क्रीम देवाने यासाठीच बनवले असणार तुला सांगतो..

अनिरुद्ध: आईस्क्रीमसारख्या थंड डोक्याच्या मद्दड माणसा! जा! ध्येयाकडे वाटचाल कर.. पण 'ती' ध्येया नव्हे.. 'ते' ध्येय! लक्षात ठेव! शेवटी काय व्याकरण महत्त्वाचे. नाहीतर अय्याताई करतील.. अश्रूपात.. आणि लागतील धारा पावसाच्या!

बबन: ओके बाबा! तिचा राग आज थंड झाला असेल तर ठीकच.. पुन्हा म्हणून त्या पुज्याचे नाव नाही काढणार! चल तयार होऊन निघतो.. तुला काय.. काम?

अनिरुद्ध: आम्ही कामाची माणसं.. पण आमचे ते काम ते हे नव्हे!

बबन: तुझ्याशी वायफळ बोलायला वेळ नाही.. मी निघतोय दहा मिनटांत.. आताच बाय..

( उठून तयारीस लागतो. थोड्या वेळाने निघून जातो )

*प्रवेश चौथा*

तीच खोली

तोच दिवस..

( घडाळ्यात दीड वाजलेले दिसतात. अनिरुद्ध खुर्चीत बसून वाचत बसलाय. बबन येतो, त्याच्या पाठीत धपाटा घालतो )

बबन: अन्या.. च्यायला.. पहाड रे.. कठीण आहे.. मंजिल बहुत दूर की है..

अनिरुद्ध: बबन महाराज.. कशाबद्दल बोलताय? काही कळेल से बोलावे.. कळले ना?

बबन: अरे तुला फक्त कामाची गोष्ट सांगतो.. भक्ती भेटली. तिचा राग पंचवीस रूपयांच्या आयस्क्रीमात गोठवला! ती वितळली.. आणि..

अनिरुद्ध: कामाचे बोल.. तुमच्या बाल प्रेमकथेच्या बाल गुलुगुलु बालगोष्टी नका ऐकवू.. बाळराजे..

बबन: बोल काहीही .. पण आज काय झाले की.. मंजिल कौनसी है उसका तो चला पता.. जाने का उधर रास्ता तो कोई दे बता..

अनिरुद्ध: कोडेबहाद्दर कीड्या.. पुढे बोलावे!

बबन: तर पुज्य बापूजी म्हणजे पहाड! आपण पैलवान म्हटल्यावर जशी प्रतिमा डोळयांसमोर येईल ना तसे. भक्तीने फोटो दाखवला आज स्वतःहून. तिलाच वाईट वाटले असणार काल रागावल्याबद्दल .. तर काय पैलवान यार! आपल्या मांडी एवढे दंड. पण चेहऱ्यावरून माणूस शांत वाटतो..

अनिरुद्ध: एक आयडिया.. उद्या जा..त्या पुज्यला सांग.. भक्ती आम्हाला द्या शांत माणसा..मग किती शांत पणे होते पहा सारे!

बबन: अन्या.. उगाच मला टेन्शन नकोय.. मी काही पैलवान नाही होऊ शकणार.. पण जस्ट रिस्पेक्टेबल तब्येत तरी बनवू म्हणतोय. आणि काय आहे ती तुला ऑलरेडी भावजी म्हणते.. सो त वरून तपेली तला ताकभात!

अनिरुद्ध: एक लक्षात घे भावा.. तू एकटाच काही या अन्याचा भाऊ नाहीस! और भी हैं भय्ये म्हणजे भाऊ.. त्यांच्यापैकी कुणाशीही लग्न लावल्यास आय कॅन स्टील बी अ भावजी..

बबन: तुला काय म्हणू? मित्र आहेस पण.. दुष्ट पण तितकाच दिसतोच.. कमीना.. यस्स.. हाच योग्य शब्द आहे तुझ्यासाठी! कमीना!

अनिरुद्ध: मला ठाऊकै.. माझी बहीण.. अमीना!

बबन: वा! काय उच्च पातळीचा विनोद!

अनिरुद्ध: थ्यांक्यू.. अतिउच्च..थ्यांक्यू.. भेटू परत मंडळी!

बबन: कुठे?

अनिरुद्ध: जहन्नुम! बाय!

बबन: थांब रे.. जहन्नुम में जात असशील तर मी ही येतो..

(न ऐकताच अनिरुद्ध निघून जातो)

बबन:

च्यायला! परत टू बी ऑर नॉट्टू बी..

बी की नको बी..

टू बी पैलवान की..

पण पैलवान व्हायचे म्हणजे कठीण आहे..खायचे काम नाही असे पण नाही म्हणता येत! खाल्ल्यावाचून पैलवानी कसली..

पण..

अपने रिक्षा और बस की  बात नहीं..

कुठल्या तोंडाने भक्ती करेल मॅनेज? माझी दंडातली बेडकी फुग फुग फुगली तरी बापुंच्या मनगटाएवढीही नाही..

उद्या समज गेलो भेटायला..

एका मुठीने आपला तर दी एंड! थोडक्यात भक्तुली कडून जिवाची हमी असेल तर पुढची बात!

तोवर आहेच हे..

खजूर आणि तारखा..! म्हणजे डेट्स!

बी ऑर नॉट्टू बी?

बी वाली खजूर की बिनबियांची?

आय थिंक.. दॅटस नॉट दी क्वेश्चन!

ॲंड दॅट कॅन नॉट बी द क्वेश्चन!

*प्रवेश पाचवा*

स्थळ: कॉलेज कट्टा

भक्ती: काय अन्या.. इथे कसा

अनिरुद्ध: कसा म्हणजे? अगं ॲडहॉक लेक्चरर झालो आज.. पहिला दिवस.

भक्ती: वा! कॉंग्रॅट्स.. बब्बू कुठेय माझा

अनिरुद्ध: तुझा.. तुला ठाऊक.. तुझा असेल तुजपाशी..

भक्ती: अय्या! काही बोलतोस.. पण त्याला मिळणार होता ना जॉब!

अनिरुद्ध: आणि मग तू करणार होतीस.. घरी घोषणा असेच ना?

भक्ती: अन्या.. तू उगाच मला.. जा..

अनिरुद्ध: जातो.. काही प्रेमसंदेस.. म्हणजे पत्र बित्र.. ग्यारंटीड डिलिव्हरी.. आणि ग्यारंटी कसली विचार..

भक्ती: बोल रे..

अनिरुद्ध: ग्यारंटी द्याट मी ते उघडून वाचणार नाही.. दे दे.. ये तेरा प्रेमपत्र..कारण सांगू? प्रेमपत्र कुणी कितीही जीव तोडून लिहिले.. रक्तासारख्या लाल शाईने ना.. तरीही त्याचे जाहीर वाचन फक्त हंशा पिकवते..

भक्ती: तू ना.. पण जाऊ दे..

अनिरुद्ध: कुठे? पण ती गूड न्यूज ऐकलीच नाहीस तू..

भक्ती: कसली रे?

अनिरुद्ध: अगं तुझा बब्बू पण लागला.. नोकरीस!

भक्ती: छिट.. नोकरी काय.. जॉब! लेक्चरर म्हणून म्हण! थांब मी त्याला फोन करते..

अनिरुद्ध: नको.. अगं तो ऑफिसात साइन करतोय पेपर.. मग इथेच येईल. तोवर तू बस.. मी निघालो..

भक्ती: बस की..

भक्ती: नको.. उगाच कबाब में कढीपत्ता कशाला?

भक्ती: अन्या.. सॉरी.. मला वाटले विसरलास..

अनिरुद्ध: असा कसा विसरेन? वो एक एक जख्म जो तुम लोगोंने दिए.. आज भी है ताजा.. दिलसे पुकारा तुमने उसे.. तो आ गया बब्बू राजा.. तो बघ आला..

( समोरून बबन येतो..)

अनिरुद्ध: चल बाय.. कढीपत्ता चालला..

बबन: ( अनिरुद्धला ) बाय! ( भक्तीकडे पाहात ) कशी आहेस?

भक्ती: कॉंग्रॅट्स.. लेक्चररबाबू.. वेल डन.. आता काय सर झालात.. तुम्ही.. मोहितेसर!

भक्ती: चूप.. लाइक ग गुड स्टुडन्ट अभ्यास कर.. नो टिवल्याबावल्या! आणि मी.. असा कट्ट्यावर बसू नाही शकणार.. टीचरच असे बसायला लागले तर?

भक्ती: असे म्हणजे कसे बब्बू? पण बाळसे धरलेय हां एका माणसाने.. व्हेरी गुड!

बबन: थ्यांक्यू.. व्हेरी मच

भक्ती: चल आज सेलिब्रेशन!

बबन: काय हवे बोल?

भक्ती: तुझ्या एखाद्या गोष्टीत तू अशावेळी काय घडवून आणशील ते!

बबन: मी? पहिली ही जागा बदलेन!

भक्ती: म्हणजे..

बबन: जे घडवायचे ते इथे कसे ना म्हणून!

भक्ती: अय्या! चावट आहेस तू.. चल आईस्क्रीम खायला जाऊ..

बबन: कशाला? ते तर रागावलीस की खातेस ना तू?

भक्ती: अय्या! तू बरे सगळे ध्यानात ठेवतोस रे!

बबन: ठेवावे लागते राणी.. ठेवावे लागते! ऐक ना.. माझ्या पैलवानाची गोष्ट ला फर्स्ट प्राइज. दीड हजार रूपये!

भक्ती: वॉव! डबल आईस्क्रीम आज! आणि पैसे तूच देणारेस.. चांगलाच मालामाल आहेस.. नवीन जॉब काय प्राइझ काय..

बबन: मला काय वाटतं माहितीय..

भक्ती: काय?

बबन: इजा झाला..

भक्ती: बापरे.. कुठे झाली तुला इजा?

बबन: 'झाली' नाही 'झाला'.. आणि इजा नाही इजा.. जा.. जेवणातला.. तर इजा झाला..बिजा झाला.. आता तिजा होणार..

भक्ती: म्हणजे तिजा गूड न्यूजचा!

बबन: म्हणजे? मी पैलवान होईन? की बापूजींचे  हृदय परिवर्तन? वा! असे झाले तर..ऐक हा.. मला ऐकू येते ते भाषण..

वा! जावईबापू वा! हा बापू या जावई बापूचे स्वागत करत आहे! अत्यंत सुस्वभावी आणि एक लेखक आणि प्रतिष्ठित महाविद्यालयात व्याख्याते

असलेल्या श्री बबनकुमार मोहिते यांनी आमची कन्या भक्ती हिचा स्वीकार करावा अशी आमची नम्र विनंती आहे! हे लग्न लावून आम्ही आखाड्यातल्या लाल मातीत परत गुंतवून घेऊ स्वतःस! स्वतः बबन पैलवान नसले तरी त्यांनी ह्या माझ्या एकुलत्या एका लेकीस पत्करून एका पैलवानाहून आपली हिंमत कणभरही कमी नाही हेच दाखवून दिले आहे..

भक्ती: काय.. काय बोललास? तरीच.. तू चांगले बोलूच नाही शकत.. मी चालले.. बाय.. बोलू नकोस माझ्याशी..

( चालायला लागते.. बबन मागे मागे जातो )

बबन: भक्तु.. सॉरी.. गंमत ना.. बघ ते आईस्क्रीम गरम होऊन जाईल.. प्लीज.. सॉरी..

भक्ती: ठीक.. आज दोन चांगल्या बातम्या होत्या म्हणून.. चल पण परत नको करूस थट्टा..

बबन: बरंय.. चांगलीच बचत! एकाच आईस्क्रीममध्ये सेलिब्रेशन पण आणि राग पण त्यातच..

भक्ती: बबन! परत..?

बबन: ओके ( तिचे कान पकडत ) कान पकडून सॉरी!

*प्रवेश सहावा*

स्थळ : भक्तीचे घर

भक्ती आत झोपलीय. तिची आई म्हणजे आते बाहेर काही कामात आहे. ती भक्तीला हाक मारतेय..

आते: भक्ती.. उठायचे नाही का? लोळत पडलीय.. भक्ती..

भक्ती: ( आतून आवाज ) थांब ना आते उठेन.. पाच मिंटे..

आते: कसं होईल लग्नानंतर हिचे कोणास ठाऊक..

(इकडे तिकडे आवराआवर करत राहते. थोड्या वेळात भक्ती उठून बाहेर येते..

आतेच्या गळयात हात टाकत..)

भक्ती: आते.. मी उठली..

आते: पूजा करू तुझी?

भक्ती: आते.. तू ना खूप छान आहेस..

आते: हो का? नक्कीच काही काम आहे दिसतंय..

भक्ती: बापू कुठेत?

आते: ते बाहेर गेलेत.. काम होते का?

भक्ती: नाही गं.. असंच!

आते: मग ठीक.. पोरीच्या बापाला एका जागी बसायला फुरसत कुठे? तरणी पोर जिवाला घोर म्हणतात ना..

भक्ती: हे काय गं.. तू मला हाकलवायला निघालीस..

आते: नाही गं.. सारं वेळच्या वेळी झालेले बरं.. परीक्षा आटोपली की..

भक्ती: हे काय आते.. मला लग्नच नाही करायचेय..

आते: इतक्यात की कधीच?

भक्ती: काहीतरीच आते..

आते: ठीक.. राहिले. बापूंना सांगू तुमच्या भक्तीला कर्त्यव्य नाही..उगाच वणवण भटकू नका.. आणि तो जो कोण आहे.. म्हणजे पर्स मध्ये फोटो घेऊन फिरतेस तो.. तो असाच..

भक्ती: हे काय आते.. तू पाहिलास..

आते: नाही म्हणजे तुला लग्नच नाही करायचे तर जाऊ देत.. नाहीतर पाहिला असता..

भक्ती: आते.. हे गं काय..

आते: कोण आहे गं..

भक्ती: आहे कॉलेजमध्ये.. बबन मोहिते

वा! आजकाल नावासकट हाक मारतात.. आमच्यावेळी नव्हती ही..

भक्ती: थेरं म्हणायचे ना तुला?

आते: हुं.. बोलले.. बोलव त्याला एकदा!

भक्ती: आते.. तू है ना अशी.. बोलावू उद्या चार वाजता? चट विचार.. पट बोलावणे

आते: पण उगाच कशाला.. लग्नच नसेल करायचे तर?

भक्ती: आते..

आते: उद्या नको.. आजच.. लाव फोन त्याला! तुझ्या बापूंना उद्या नाही वेळ..

भक्ती: ओके आते.. मी तुझ्या शब्दाबाहेर थोडीच आहे.. जो आज्ञा आईसाहेब

आते: बरं बरं.. उगाच नाटकं नकोत..

भक्ती: ठीक आते.. मी आते जाते.. नाही आते जात.. नाही आत जाते आते नि फोन करते..

आते: कशाला? मीच जाते.. तू बोल

( आते आत निघून जाते )

भक्ती : ( फोनवर ) ऐक जानू.. बब्बू..

शायद मेरी शादी का खयाल दिल में आया है.. इसीलिए मम्मी ने मेरी तुम्हें चाय पे बुलाया है..

बबन:( पलिकडून आवाज ) कधी?

भक्ती: आजच.. दुपारी चार वाजता..( गात ) ठीक तुम चार बजे घर चले आना.. मेरा हाथ मांग लेना.. जरा न शरमाना..

बबन: शरमाना नाही.. घबराना म्हण! आणि तुझे गाणं बस गं.. एकाएकी काय हे.. माझी तयारी..

भक्ती: तयारी रे काय.. अंघोळ कर आज म्हणजे झाले..आणि भांग पाड आज

बबन: अगं तुझे ते पैलवान.. बापू पुज्य.. माझेच पुज्य होणार आज..

भक्ती: घाबरू नकोस रे.. मी आहे ना! आणि तुला सरप्राइज पण आहे..

बबन: काय? बापू पैलवान तसे .. तुझी आई कराटे चॅंप आहे.. ब्लॅक बेल्ट.. असे काही नाही ना?

भक्ती: चुप रे.. ये मग कळेल आणि रुध्द भावजींना घेऊन ये..

बबन: कोण? रूद्ध?

भक्ती: अन्या म्हणजे.. अनिरुद्ध रे..

बबन: बाय..सी यू.. टेन्शन.. आणि अटेन्शन सुद्धा!

भक्ती: आणि अय्या! बोलायचे राहिली.. तो लाल शर्ट घालून ये.. त्यात तू क्यूट दिसतोस.. बाय..

(पाठी घड्याळात पावणे चार वाजलेत. आते आत किचन मध्ये. किचन मधून बाहेर हॉल मधले दिसायला एक खिडकी आहे. त्याच्या आत एक बेडरूम. बेल वाजते. भक्ती बाहेर येत..)

भक्ती: अरे वा! वेळेआधीच.. बस.. बसा ना!

अनिरुद्ध: गुडघ्याला बाशिंग आहे.. वेळेआधी पोचणारच..

बबन: अन्या..

( अनिरुद्ध आणि बबन दोघे आत येतात.)

भक्ती: मी आलेच हां..

( आत जाते )

बबन: (आजूबाजूला पाहात ) पैलवानाचे घर वाटत नाही. मला वाटलं घरात पण लाल माती असेल..

अनिरुद्ध: नाही.. तुझा शर्टच फक्त लाल आहे इथे..

बबन: अरे पण..

अनिरुद्ध: जे जे होईल ते ते पहावे.. तुका म्हणे..

बबन: तू हे असे का म्हणे?

अनिरुद्ध: जे जे दिसे ते अवलोकावे.. तुका म्हणे!

बबन: टेन्शन.. नि तुला गंमत सुचतेय?

अनिरुद्ध: सोड रे.. पे अटेन्शन! अवलोकन!

( आतून आते खिडकीतून बाहेर बघत..)

आते: भक्ती कोण आहेत ग हे दोघे?

भक्ती: असं काय आई.. बबन आणि तो अनिरुद्ध.. त्याचा खास मित्र..

आते: यातला बबन कोण?

भक्ती: तो डावीकडील.. लाल शर्ट

आते: मग तो फोटोतला? पैलवान?

भक्ती: ( गडबडत विषय बदलत ) अगं आते.. बापू नाही आले अजून.

आते: येतील.. पण तो फोटो?

भक्ती: मी येतेच हां आते.. तयार होते..

आते: पण तयारच आहेस तू..

भक्ती: नाही.. थोडी अजून होते तयार..

( आत निघून जाते )

बबन: अरे काही सरप्राइज आहे बोलली भक्ती..

अनिरुद्ध: काही नाही रे तिची आई ब्लॅकबेल्ट असणार.. कराटेत..नायतर तायक्वांदो..

बबन: काय क्वोंदो? मला वाटतेय या भूतलावरील आपला अंतिम दिवस..

अनिरुद्ध: आपला नाही रे.. तुझा म्हण!

बबन: अन्या..! आजपासून आपला डबा.. एकाच माणसाचा सांग.. दुधाच्या हिशेबातले माझे पैसे ठेवलेत टेबलाच्या ड्रॉवरात..आणि.. भेटू पुढल्या जन्मी.. या जन्मातील मैत्रीबद्दल थ्यांक्यू..

अनिरुद्ध: गप रे ना..टक्का..र!

( उघड्या दरवाजातून एक कृश माणूस.. पन्नाशीतला.. आत शिरतो. त्याच्या हातात एक पिशवी आहे. एक नजर बबन नि अनिरुद्धकडे टाकतो )

माणूस: बसा हां.. मी आलोच. तुम्हाला येऊन फार वेळ तर नाही ना झाला?

बबन: नाही.. हे आताच तर आलो

माणूस: बसा.. आलोच

( तो माणूस आत जातो )

बबन: कोण असणार रे हे गृहस्थ?

अनिरुद्ध: मला वाटते हेच ते सरप्राइज..

बबन: कायतरी.. बहुधा मामा असणार भक्तीचे..वरसंशोधनास आले असणार.. बापू दिसत नाहीत.. मामा.. ॲम शुअर.. ॲंड ही इज सो किडकिडीत!

अनिरुद्ध: हो ना! सगळेच काय तुझ्यासारखे नसतात.. पहिलवान!

( माणूस किचन मधल्या खिडकीतून..)

माणूस: काय गं.. हा तो मुलगा आहे?

आते: हो.. भक्ती म्हणाली तो डावीकडे तो बबन..लाल शर्ट

माणूस: मग तो? फोटोतला? पैलवान?

आते: मला काय ठाऊक?

माणूस: पण हा पण तसा बरा आहे..

( आतून भक्ती बाहेरच्या खोलीत येते. चपलांकडे पाहात.. )

भक्ती: अय्या! बापू आले.. बापू..

( तो कृश माणूस बाहेर येतो.)

भक्ती: ओळख करून देते हां.. बबन.. हे माझे बापूजी! बापू हा बबन मोहिते नि हे त्यांचे मित्र अनिरूध्द. आमच्या कॉलेजमध्ये आहेत..

( इकडे बबन आ वासून बघतो आहे. अनिरुद्धची देहबोली अशी की त्याला सारे ठाऊक आहे.. बबन पेचात पडतो.. या कृश माणसासमोर एका पैलवानाबद्दल काय बोलणार? हेच ते सरप्राइज? बबन गप्प बसून राहतो )

भक्ती: बापू.. हा बबन की नाही लेखक पण आहे.. आता आमच्याच कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून लागलाय. मागच्या दिवाळीत याच्या गोष्टीला पहिले बक्षीस मिळालेले.. कोणती रे ती गोष्ट बबन?

बबन: ( एकाएकी भानावर येत ) ती ना? एका पैलवानाची गोष्ट!

भक्ती: विनोदी होती हां..

बापू: अगं पण तो फोटो

भक्ती: कोणता बापू?

बबन: मी पण तेच विचारू पाहतोय.. अगं पण तो फोटो?

भक्ती: कोणता फोटो? मी चहा आणते हां आतून.. आते तू बाहेर ये ना.. मी बघते आतले..

बापू: अगं कुसुमावती.. ये जरा बाहेर..

( आते बाहेर येते. हातात एक फोटो घेऊन..)

आते: तुम्ही बबन का?

बबन: हो.. आणि कोण असणार?

आते : ( बापूंना फोटो दाखवत ) पहा हो, कुठल्याही कोनातून हे बबन मोहिते दिसतात का?

( बापूजी पाहू लागतात )

बापू: हे बबन तर तुम्ही कोण? नाही.. तुम्ही बबन तर हे कोण?

बबन: पाहू मला फोटो

बबन : (फोटोकडे पाहात) अरे हेच तर बापूजी.. भक्तीने हाच दाखवलेला फोटो बापूंचा.. आणि हे बापूजी तर या फोटोत कोण? फोटोत पैलवान आणि प्रत्यक्ष बापूजी हे असे.. बोलता बोलता जीभ चावत.. हे इथे..

आते: बाई गं! कमाल आहे या पोरीची.. भक्ती.. बाहेर ये..

भक्ती : (साळसूदपणे ) काय झाले बापू?

बापू: हे बबन.. तर ( फोटो कडे बोट दाखवून ) हे कोण?

बबन: हे बापू तर ( फोटोकडे बोट दाखवून ) हे कोण?

अनिरुद्ध: मी बोलू? मी सांगतो.. हा फोटो संभाजी काकडे म्हणून एक पैलवान आहेत त्यांचा.. गुगलवरचा .. मीच काढून दिला या भक्तीताईंना!

भक्ती: बापू.. बबन है ना खूप बारीक होता.. लिहिण्यामागे खायच्या प्यायच्याकडे दुर्लक्ष करायचा.. म्हणून मी त्याला बोलली.. पहिलवान झालास तरच तुझा नंबर लागेल..हे अनिरुद्धला माहिती होते ना..

बबन: म्हणजे? अन्या? तू ही? कटात सामील?

बबन: तरी मी म्हणालो हे पैलवानांचे घर नाही वाटत..

अनिरुद्ध: सूक्ष्म अवलोकन! आणि अहो, आज हा जो काही दिसतोय ना काही अंगावर मांस चढलेला.. तो भक्तीमुळे. बिचारा.. रोज व्यायाम करतो हल्ली!

बापू: म्हणजे भक्ती.. तुझी शक्ती तू ही अशी वापरलीस तर!

भक्ती: हे खरेय.. सॉरी बापू.. पण या बबनला सुधरायला दुसरा कुठला उपाय नव्हता ना!

अनिरुद्ध: बघ बबन .. ही एक ओरिजीनल झाली गोष्ट..

बबन: लिहून टाकतो..

बापू: आम्हाला ही घ्या गोष्टीत!

बबन: हो तर! गोष्टीत ही गोष्ट घालतोच.. प्रत्यक्ष अनुभवलेली

अनिरुद्ध: म्हणालो ना.. अनुभव महत्वाचा! आणि या भक्तीताईच्या मनोव्यापारावर ही बोलू काही.. म्हणजे गोष्ट कशी.. फस्क्लास!

बबन: हुं.. अ अ म! अवलोकन.. अनुभव आणि..

भक्ती: मन व्यापाराचे ज्ञान!

बबन: मनोव्यापार भक्ती.. मनव्यापार नव्हे.. आणि सूक्ष्म हवे ते!

अनिरुद्ध: हो ना बबनराव! पाहिले आम्ही तुमचे सूक्ष्म अवलोकन.. जे मला ठाऊक होते ते याला कळले नाही.. आणि या भक्तीच्या मनातले तर.. नाहीच नाही!

बबन: बापूजी.. हा म्हणतो ते खरेय.. आय ॲक्सेप्ट..

बापू: काही मनाला लावून घेऊ नका.. जावईबापू! ही भक्ती अशीच आहे..

भक्ती: अय्या! जावई बापू! ( लाजून आत पळत जाते )

बापू: आता वापरा तुमचे अवलोकन.. अनुभव आणि जमलेच तर.. मनोव्यापाराचे .. सूक्ष्म.. ज्ञान या भक्तीवर.

आते: आणि तेही जन्मभर!